# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजूला, उस्मानपुरा,
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद -४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax २३५६८२०
http://www.dteau.org. email:-roaurangabad.dte@gmail.com


परिपत्रक

जा.क्र.विकाऔ/आस्था-ओएस/२०१९/३९८३
दिनांक :- 15 OCT 2019

प्रति,
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय औरंगाबाद,
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद,जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद,बीड,
पु.ला.शा.तं.लातूर,शा.नि.म.तं.नि.लातूर.

**विषय** :- निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) हे पद पदोन्नतीने भरणेबाबत.

**संदर्भः** १.महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, अधिसूचना क्र.न्यायाप्र-२२१३/(१४१/१७)/तांशि-२,दि.०९/०१/२०१९.
२.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१२/आस्था(१)/२०१९/२७, दि.२२/०१/२०१९.
३.या कार्यालयाचे पृष्ठांकन क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९/४४५, दि.०१/०२/२०१९

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्थांमधीन निदेशक(तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक)(वेतन स्तर- एस ८:रु.२५५००-८११००/-) ही पदे पदोन्नतीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार सदर पदासाठी प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पद धारण करणा-या व त्या पदावर ५ वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या, आणि ज्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयांसह उत्तीर्ण केली आहे अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य त्या व्यक्तीच्या पदोन्नतीने भरण्यात येतील.

सबब आपल्या संस्थेतील जे प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पदावरील कर्मचारी निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती व त्यांचे अर्ज खालील प्रपत्रामध्ये भरुन त्वरित या कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत छायाप्रतींसह सादर करावी.

| अ.क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नाव | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | नेमणुकीचा प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे ? | शेरा/ अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |

निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट मिळालेली नसेल, तर त्यांना सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

तसेच सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती या विभागांतर्गत कोणत्याही शासकीय संस्थेत बदलीस पात्र ठरतील. कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-याकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

आपल्या संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी, तसेच सदरचे पत्र आपल्या संस्थेतील सर्व प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी. सदर माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत, या कार्यालयातील प्रोग्रामर यांना माहिती व कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.